Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/727
पुणे-४११ ००४
दिनांक-१६/०२/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ चे प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.....

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/५५०८ दि.२६/१२/२०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./गणकयंत्र/१/१७८ दि.१५/०१/२०२४
३. या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-२/५७२ दि.०९/०२/२०२४

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रे पहावीत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ चे प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

या संदर्भात सूचित करण्यात येते की, इयत्ता १२ वी परीक्षेतील प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी गुरूवार दिनांक २९/२/२०२४ पर्यंत कालावधी देण्यात येत आहे. या कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी ऑनलाईन पध्दतीने गुण नोंदवून मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत.

तसेच संदर्भीय पत्र क्र. २ सोबत जोडलेल्या कार्यपध्दतीमधील सुचना क्र. ८ नुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकानिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेऊन त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेऊन सदर गुणतक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटामध्ये, पाकिटावर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, Index No. घालून सोमवार दिनांक ०४/०३/२०२४ पर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीस्तव-व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.